# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र.९६४/२०२१

**विषय :— अंतिम वर्षाच्या परीक्षा व निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आवारातील वसतिगृह खोलीचा ताबा सुपूर्त करणेबाबत...**

**संदर्भ :— वसतिगृह कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२५/२०२० दिनांक — ०६/०८/२०२०**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील वसतिगृहामध्ये २०२०—२१ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित असणाऱ्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपुष्टात आलेल्या आहेत तसेच निकालही जाहीर झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, आपण राहात असलेल्या वसतिगृह खोलीचा ताबा दिनांक ३०जून,२०२१ पर्यत वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावा, जेणेकरून शैक्षणिक वर्ष २०२१—२२ वसतिगृह प्रवेशाचे नियोजन करणे तसेच वसतिगृहाची देखभाल व दुरूस्तीची कामे करणे सोयीचे होईल.

वसतिगृह कार्यालयाकडून वसतिगृह खोलीतील साहित्य घेवून जाण्यासाठी परिपत्रक क्रमांक २२५/२०२० प्रमाणे प्रकिया पुर्ण करणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी. कृपया सदरील परिपत्रकातील शैक्षणिक वर्ष २०१९—२० ऐवजी २०२०—२१ असे गृहित धरावे.

जे विद्यार्थी वर नमूद केलेल्या दिनांकापर्यत सदरील वसतिगृह खोलीचा ताबा वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे वसतिगृह खोलीमधील साहित्य पंचनामा करून वसतिगृह कार्यालय व सुरक्षा विभाग यांच्या संयुक्त देखरेखीखाली वसतिगृह सामान कक्षात ठेवण्यात येईल. सामान कक्षात ठेवलेल्या साहित्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची असेल, याची कृपया नोंद घ्यावी.

मुख्य वसतिगृह प्रमुख

मुख्य वसतिगृह प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
सा.फु.पु.वि/वसतिगृह/२०२१—२२/
दिनांक :— १२/०६/२०२१

<u>प्रत माहितीसाठी सादर :—</u>

१) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे— ०७

२) मा. विभागप्रमुख :— आपल्या विभागातील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.

३) मा. संचालक, सुरक्षा :— आपल्या माहितीत्सव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.